## पंतप्रधानांचा कुवेतच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने गौरव

22 डिसेंबर 2024

कुवेतचे अमीर महामहिम शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना कुवेतचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार 'द ऑर्डर ऑफ मुबारक अल-कबीर' ने सन्मानित केले. कुवेतचे पंतप्रधान महामहिम शेख अहमद अल-अब्दुल्ला अल-अहमद अल-सबाह हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

2. पंतप्रधानांनी भारत आणि कुवेत यांच्यातील दीर्घकालीन मैत्री, कुवेतमधील भारतीय समुदाय आणि भारतातील 1.4 अब्ज लोकांना हा पुरस्कार समर्पित केला.

3. 43 वर्षांनंतर भारताच्या पंतप्रधानांच्या कुवेतच्या या ऐतिहासिक दौऱ्यावेळी हा पुरस्कार मिळाल्याने या सोहळ्याला विशेष अर्थ प्राप्त झाला.

4. या पुरस्काराला 1974 मध्ये सुरुवात करण्यात आली आणि आजतागायत निवडक जागतिक नेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

**कुवेत**

**22 डिसेंबर 2024**